## निवडक

### राजस्थानची धुरा पुन्हा संजू सॅमसन



**मुंबई, दि. ३ :** संजू सॅमसन पुन्हा एकदा राजस्थान रॉयल्स संघाची धुरा सांभाळताना दिसणार आहे. हिंदुस्थान क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्राने बुधवारी संजू सॅमसनला फिट घोषित करून आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत खेळण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे संजू सॅमसन शनिवारी पंजाब किंग्ज संघाविरुद्ध मैदानावर उतरणार आहे. संजू सॅमसन फिट नसल्यामुळे आयपीएल सुरू होण्यापूर्वीच राजस्थान रॉयल्स संघाने संजू सॅमसनच्या जागी अष्टपैलू रियान परागला कर्णधारपद दिले होते, मात्र आता पुन्हा एकदा संजू सॅमसनकडे ही जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. टीम इंडियाकडून खेळताना संजू सॅमसनच्या हाताला दुखापत झाली होती. त्यामुळे बीसीसीआयच्या राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्राने त्याला यष्टिरक्षक आणि कर्णधारपदाची परवानगी दिली नव्हती. त्यामुळे राजस्थान रॉयल्सच्या संघ व्यवस्थापनाने पहिल्या तीन सामन्यांसाठी रियान परागला संघाचा कर्णधार बनवले होते.

### गुजरातचा बंगळुरूवर शानदार विजय



**बंगळुरू, दि. ३ :** शानदार खेळाच्या जोरावर गुजरात टायटन्स संघाने बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर दणदणीत विजय साकारला. गुजरातने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. गुजरातच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करत बंगळुरूला १६९ धावातच रोखले. छोट्या स्टेडियमवर जोस बटलर आणि साई सुदर्शन यांनी मॅरेथॉन भागीदारी साकारत विजयाचा पाया रचला. सुदर्शनचे अर्धशतक अवघ्या एका धावेने हुकले. पण बटलरने मनमुराद फटकेबाजी करत अर्धशतक पूर्ण केलं. बंगळुरूकडून मिळालेल्या १७० धावांच्या माफक  लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातचा कर्णधार शुबमन गिल झटपट बाद झाला. पण यानंतर साई सुदर्शन-जोस बटलर जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ४७ चेंडूत ७५ धावांची भागीदारी करत बंगळुरूच्या गोलंदाजांना निरुत्तर केलं. हेझलवूडने सुदर्शनला बाद केलं. सुदर्शन बाद झाल्यावर बटलरने सामन्याची सूत्रं हाती घेतली. शेरफन रुदरफोर्डने त्याला चांगली साथ देत गुजरातच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. बटलरने ३९ चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह नाबाद ७३ धावांची खेळी केली. रुदरफोर्डने १८ चेंडूत ३० धावांची खेळी करत बटलरला चांगली साथ दिली. तत्पूर्वी, अर्शद खानने विराट कोहलीला बाद करत बंगळुरूला पहिला धक्का दिला. फिल सॉल्टला जोस बटलरने जीवदान दिले पण तो याचा फायदा उठवू शकला नाही. त्याने १४ धावा केल्या. मोहम्मद सिराजने त्याला बाद केले. सिराजनेच देवदत्त पड्डीकलला माघारी पाठविले. पॉवरप्लेच्या षटकांचा बंगळुरू फायदा उठवू शकलं नाही. रजत पाटीदार स्थिरावलाय असे वाटत असतानाच इशांत शर्माने त्याला तंबूत पाठविले.  यानंतर लायम लिव्हिंगस्टोन आणि जितेश शर्मा यांनी सहाव्या विकेटसाठी ३८ चेंडूत ५२ धावांची भागीदारी केली. साईकिशोरच्या गोलंदाजीवर आक्रमण करण्याचा जितेशचा प्रयत्न फसला. त्याने २१ चेंडूत ३३ धावांची खेळी केली. जितेशच्या जागी आलेल्या टीम डेव्हिडने लिव्हिंगस्टोनला चांगली साथ दिली. लिव्हिंगस्टोनने ४० चेंडूत १ चौकार आणि ५ षटकारांसह ५५ धावांची खेळी केली. टीम डेव्हिडने १८ चेंडूत ३२ धावा केल्या. या तिघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे बंगळुरूने १६९ धावांची मजल मारली. मोहम्मद सिराजने ३ तर साई किशोरने २ विकेट्स घेतल्या.

# बेंगळुरू एफसीचे पाऊल पडते पुढे

## आयएसएल ; उपांत्य फेरीच्या पहिल्या लेगमध्ये एफसी गोवा वर २-० विजय

**बेंगळुरू, दि. ३ :**

घरच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीच्या पहिल्या लेगमध्ये बेंगळुरू एफसीने जबरदस्त फॉर्म कायम राखताना एफसी गोवाला २-० असे हरवत इंडियन सुपर लीगच्या (आयएसएल) २०२४- २५ हंगामाच्या अंतिम फेरीच्या दिशेने पाऊल टाकले.

नॉकआऊट फेरीत मुंबई सिटी एफसीचा ५-० असा धुव्वा उडविणाऱ्या यजमानांनी श्री कांतिरावा स्टेडियमवर एकतर्फी वर्चस्व गाजवले. संपूर्ण सामन्याचा आढावा घेतल्यास चेंडूवर ताबा ठेवण्यात एफसी गोवाने (४२- ५८ टक्के) बेंगळुरू एफसीच्या तुलनेत मोठी आघाडी घेतली. पेनल्टी कॉर्नर मिळविण्यातही पाहुण्यांनी (१०-३) वर्चस्व गाजवले. मात्र, बेंगळुरू एफसीने शांत डोक्याने खेळ करताना सुरेख चाली रचल्या. त्याचा त्यांना फायदा झाला. बेंगळुरू एफसीने प्रभावी आक्रमण आणि मजबूत बचावाच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाला गोल करण्यापासून रोखले.

४२व्या मिनिटाला बेंगळुरू एफसीचे गोल खाते उघडले. त्याचे श्रेय पाहुण्या संघाला जाते. रायन विल्यम्सच्या पासवर सुरेश सिंगने गोल करण्याचा सुरेख प्रयत्न केला. मात्र, एफसी गोवाचा डिफेंडर संदेश झिंगनने चेंडू सेव्ह करताना आपल्याच गोलपोस्टमध्ये चेंडू ढकलले. या गोलच्या बळावर बेंगळुरू एफसीने मध्यंतरला १- ० अशी आघाडी घेतली. आत्मविश्वास उंचावलेल्या यजमानांनी ५१व्या मिनिटाला आघाडी वाढवली. नामग्याल भुतियाच्या क्रॉसवर स्ट्रायकर एडगर मेंडेझने चेंडूवर ताबा घेत एफसी गोवाची बचावफळी भेदत उजव्या कॉर्नरवरून अप्रतिम गोल केला.

बुधवारच्या विजयासह बेंगळुरू एफसीने उपांत्य फेरीच्या लेगमध्ये २- ० अशी आघाडी घेतली. त्यामुळे त्यांची अंतिम फेरीची दावेदारी अधिक मजबूत झाली आहे. उभय संघांमधील दुसऱ्या लेगचा सामना रविवारी (६ एप्रिल) गोवा येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर होईल.





# हरमल बीच फुटबॉल स्पर्धेचे बायणा क्लबला जेतेपद

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. ३ :** येथील एबीसी स्पोर्ट्स क्लब, हरमल आयोजित २१ व्या राष्ट्रीय बीच फुटबॉल स्पर्धेत पोगबा क्लब वास्को संघाचा १- ० गोलनी पराभव करून

बायणा फुटबॉल संघाने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत १६ संघांनी सहभाग घेतला होता.विजेत्या संघासाठी सतीश नाईक यांनी विजयी गोल केला. विजेत्या संघास रोख रू २५ हजार व उपविजेत्या संघास रोख रू १५ हजार व चषक देण्यात आले. बक्षीस वितरण सोहळ्यात पुरस्कर्ते सरपंच अनुपमा मयेकर, रिसॉर्ट्सचे मॅनेजर विपुल, एबीसी संघाचे चेअरमन इनासियो डिसोझा, एलियास फर्नांडिस आदी उपस्थित होते.

खेळाडूंनी उत्कृष्टप्रकारे खेळ करून प्रेक्षकांची मने जिंकली. खेळातून तंदुरुस्त होण्यासाठी खेळाडूंनी प्रयत्न केले पाहिजे. खेळाडूंनी व्यसनापासून दूर राहून क्रीडा क्षेत्रात उपलब्ध संधीचा व करीयर घडवण्यासाठी लाभ घ्यावा, असे आवाहन क्लबचे चेअरमन डिसोझा यानी केले. मॅनेजर विपुल यांनी खेळाडूंचे कौतुक केले व आयोजक संघास शुभेच्छा दिल्या. क्लबचे ग्लॅडसन कार्डोज यांनी सूत्रसंचलन यांनी केले तर इलियास फर्नांडिस यांनी आभार मानले.

# कर्णधाराची जबाबदारी मिळणार असल्याने घेतला निर्णय : जैस्वाल

**मुंबई, दि. ३ :**



टीम इंडियाचा स्फोटक सलामीवीर यशस्वी जयस्वालने मुंबई सोडण्याबाबत आपले मौन सोडले आहे. त्याने मुंबई का सोडली आहे हे सांगितले आणि आता तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये गोव्याकडून खेळताना दिसेल. अलिकडेच बातमी आली की जयस्वालने आगामी देशांतर्गत हंगामासाठी गोव्यात सामील होण्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून एनओसी मागितली आहे. जयस्वालने आता मुंबई सोडून गोव्याकडून खेळणार असल्याची पुष्टी केली आहे.

जयस्वाल म्हणाला की, मुंबई सोडण्याचा निर्णय खूप कठीण होता आणि आज तो त्याच्या कारकिर्दीत जिथे आहे त्याबद्दल तो एमसीएचा ऋणी आहे. जयस्वालने सांगितले माहितीनुसार, माझ्यासाठी हा खूप कठीण निर्णय होता. आज मी जे काही आहे ते मुंबईमुळे आहे. या शहराने मला बनवले आहे आणि मी आयुष्यभर एमसीएचा ऋणी राहीन. जयस्वालने पुष्टी केली की गोव्याने त्याला नेतृत्वाची भूमिका देऊ केली आहे, म्हणूनच तो मुंबई संघ सोडत आहे. तो म्हणाला, गोव्याने मला एक नवीन संधी दिली आहे आणि त्यामुळे मला नेतृत्वाची भूमिका मिळाली आहे. माझे पहिले लक्ष्य भारतासाठी चांगली कामगिरी करणे असेल आणि जेव्हा जेव्हा मी राष्ट्रीय संघात नसेन तेव्हा मी गोव्यासाठी खेळेन आणि स्पर्धेत त्यांना पुढे नेण्याचा प्रयत्न करेन. ही एक (महत्वाची) संधी होती जी माझ्याकडे आली आणि मी ती स्वीकारली. जयस्वालला एनओसी मिळाली आहे आणि तो पुढील हंगामात गोव्याचे कर्णधारपद भूषवण्यास सज्ज आहे. एम.सी.ए.च्या नाहरकत प्रमाणपत्रात जयस्वालने त्याच्या निर्णयामागे करिअरच्या आकांक्षा आणि वैयक्तिक परिस्थिती यांचा उल्लेख केला आहे. जयस्वालने लिहिले की, मला देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला आहे आणि असोसिएशनने दिलेल्या संधींचा मला खूप फायदा झाला आहे. तथापि, माझ्या कारकिर्दीच्या आकांक्षा आणि वैयक्तिक परिस्थितीचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर, मी माझा देशांतर्गत क्रिकेट प्रवास सुरू ठेवण्यासाठी गोव्याला जाण्याचा निर्णय घेतला आहे.




Terms and Conditions apply. **Approval of the loan is at the sole discretion of the financiers, and additional documentation may be required. **The interest rates, down payment, and tenure options are based on the financier's assessment of the applicant's credit profile. **The offers/features may be modified or withdrawn at any time without prior intimation. #Cashback Offer available on all Honda2wheelers models for EMI transactions made using IDFC FIRST Bank credit cards through Pine Labs machines only. #Customers can avail 5% Instant cashback, up to a maximum of ₹ 5000. #Valid on one transaction per card/order during the offer period. #The scheme is available in selected outlets only. *3 Years Free Service Maintenance Package is available only on Deluxe variant of Activa 110 and Activa 125. *For detailed Terms and Conditions of the 3-Year Free Service Maintenance Package worth ₹ 5500, kindly contact authorised main dealers and associate dealers. *Above scheme can be withdrawn at any time without prior intimation. All offers are valid until 30th April 2025. The features shown in the creative are may not be available in all variants. Product shown in the picture may vary from actual product available in the market. Accessories shown in the picture are not part of standard equipment.

**Honda Motorcycle & Scooter India Pvt. Ltd., Registered Office:** Plot No. 1 , Sector - 03, IMT Manesar, Distt. Gurugram, (Haryana) – 122050, India; **Website:** www.honda2wheelersindia.com; **Customer Care:** customercare@honda.hmsi.in

**Honda Exclusive Authorized Dealerships: MAPUSA:** Counto Honda - 7447799507, 9850266777, 9175093474; **BICHOLIM:** Counto Honda - 8806667848; **MARGAO:** Goa Rajee Honda - 0832-2791751-55, 9552988811; **PANJIM:** Priority Honda - 0832-2233551, 8888885157; **MARCELA:** Priority Honda - 08322288944, 7719917776; **PONDA:** Goa Rajee Honda - 9552988822; **VASCO:** Goa Rajee Honda - 9552988833; **XELDEM:** Goa Rajee Honda - 9552988844; **CANACONA:** Goa Rajee Honda - 9881060727.

**For Bulk/Institutional enquiries, please write us at: institutionalsales@honda.hmsi.in**

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २११ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 211 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .